**सातारा जिल्हा परिषद,सातारा,ग्रामपंचायत विभाग.**

दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३८४३ ईमेल vptzpsatara2@yahoo.in

**अत्यंत महत्वाचे** क्र.ग्रापं/५/कावि/ ६५१२ /२०१६, दिनांक ४ /७/२०१६

प्रति,

........................................

........................................

........................................

(शासकिय यंत्रणा विभागप्रमुख व जि.प.खातेप्रमुख)

विषय :- **आमचं गाव आमचा विकास - ग्रामपंचायत विकास आराखडा प्रभावी अंमलबजावणीबाबत..**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र.३८/पं.रा.-६ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये, १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार 'आमचं गाव आमचा विकास' या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या उपक्रमांतर्गत विविध लक्ष घटकांचे क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले आहेत. दिनांक १ जून,२०१६ रोजी जिल्हास्तरावर झालेल्या जिल्हास्तरीय विभाग प्रमुखांच्या कार्यशाळेमध्ये आपणास ग्रामपंचायत विकास आराखडयाविषयी सविस्तर माहिती देणेत आली आहे.

ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना गावपातळीवरील सर्व शासकीय, निमशासकीय व अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यांचे सक्रिय सहभागाशिवाय ग्रामपंचायत विकास आराखडा परिपूर्ण होऊ शकणार नाही. ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या कार्यशाळा त्या-त्या गणामध्ये संपन्न झाल्या असून कर्मचाऱ्यांना त्यांची जबाबदारी सांगण्यात आली आहे.

सद्यस्थितीत, प्रत्यक्ष साडेतीन दिवसीय गावस्तरावरील लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया ग्रामपंचायत स्तरावर सुरु करण्यात आली असून या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करुन त्यास दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी ग्रामसभंमध्ये अंतीम मान्यता घ्यावयाची आहे. या प्रक्रियेपूर्वी ग्रामपंचायत पुस्तिका व महसुली गाव पुस्तिका भरुन ग्रामपंचायत एकात्मिक माहितीकोष तयार करावयाचा आहे. तसेच गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी साडेतीन दिवसाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

त्यानुसार, आपण आपले अधिनस्त गाव पातळीवरील सर्व कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या साडेतीन दिवसाच्या प्रक्रियेमध्ये पूर्णवेळ उपस्थित राहणेबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात. सदर प्रक्रियेमध्ये कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत आपणास जबाबदार धरण्यात येईल,याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच आपण स्वतः आणि तालुकास्तरावरील आपले अधिनस्त अधिकारी यांनीही वेळोवेळी ग्रामपंचायतींना भेटी देऊन ग्रामपंचायतींना विकास आराखडा तयार करणेसाठी मार्गदर्शन करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी.
जिल्हा परिषद,सातारा.

जिल्हाधिकारी.
सातारा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ............(सर्व), जि.सातारा